# सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,

शासकीय तंत्रनिकेतन परिसर, मंगळवारी बाजार सदर, नागपूर.

ISO 9001 : 2008

दुरध्वनी कमांक: २५६५१४३ E-mail : ronagpur.dte@gmail.com फॅक्स कमांक:०७१२–२५६१६६३


तातडीचे / कालमर्यादीत

क्रमांक : तंशिसं / विकाना / लेखा / अर्थसं / अर्थ.अंदाज / २०१२–१३ / २६५,
दिनांक : ०४ / ०९ / २०१२.

प्रति,
प्राचार्य,
शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, चंद्रपूर.
शासकीय तंत्रनिकेतन, नागपूर / ब्रम्हपूरी / गडचिरोली / साकोली / आर्वी / गोंदिया
शासकीय हॉटेल मॅनेजमेंट ॲड कॅटरींग टेक्नॉलाजी, नागपूर.

**विषय — सन २०१३–२०१४ अर्थसंकल्पीय अंदाज आणि सन २०१२–१३ सुधारीत अंदाज (योजनेत्तर) प्रस्ताव पाठविणेबाबत.**
**मुख्य लेखाशिर्ष २२०३ तंत्रशिक्षण (योजनेत्तर)**
**०२०२ शिक्षण, क्रिडा, कला व संस्कृती (०२, तंत्रशिक्षण) महसुल जमा.**

संदर्भ — मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांचे पत्र क्र. १५ / अर्थसं / अर्थ. अंदाज / २०१२–१३ / ८२, दि. ०३.०९.२०१२ अन्वये.

उपरोक्त संदर्भांकीत विषयान्वये आपणांस कळविण्यात येते की, सन २०१३–२०१४ चे अर्थसंकल्पीय अंदाज व सन २०१२–२०१३ चे सुधारीत अंदाज तयार करण्याबाबत शासनाने निर्देशन दिलेले आहेत. आपल्या संस्थेचा खर्च भागविण्यासाठी शासनाकडून तरतूद उपलब्ध करुन घेण्यासाठी, संस्थांचे अर्थसंकल्पीय अंदाज तयार करतांना दिनांक ०१.०४.२००४ च्या शासन निर्णय व त्यानंतरच्या शासन निर्णयान्वये वेळोवेळी मंजूर झालेल्या पदांप्रमाणे स्थायी /अस्थायी तसेच वर्गनिहाय पदे जुळवून शासनाने मंजूरी दिलेल्या पदांचाच अर्थसंकल्पिय अंदाजामध्ये अंतर्भाव करण्यात यावा तसेच सदर माहिती उपलेखाशिर्षनिहाय तयार करावी.

आपल्या संस्थेकरीता सन २०१३–२०१४ चे अर्थसंल्पीय अंदाज व सुधारलेले अंदाज २०१२–२०१३ चे खर्चासाठी शासनाकडून तरतूद उपलब्ध करुन घेण्याकरीता सोबत जोडलेल्या विहित प्रपत्रानुसार आवश्यक त्या तरतुदींचा योग्य प्रमाणात विचार करुन सर्व संबंधित माहिती भरुन या कार्यालयास **दिनांक १५.०९.२०१२ पर्यंत व्दिप्रतीमध्ये समक्षरित्या सादर करण्यात यावे. सदर माहितीमध्ये महागाई भत्याची परिगणना सुधारित अंदाजाकरीता ७५ टक्के व अर्थसंकल्पिय अंदाजाकरीता ८५ टक्के दराने करावी.** सदर माहिती या कार्यालयास विहित कालावधीमध्येच सादर करण्याबाबत कार्यालय प्रमुखाने दक्षता घ्यावी.

सोबत संस्थेचे माहे एप्रील, २०११ ते मार्च, २०१२ पर्यंतच्या खर्चाचे विवरणपत्र संलग्न.

सहपत्र — *वरीलप्रमाणे.*

सुचना - यासंबंधीची प्रपत्रे आपल्या संस्थेच्या ईमेल पत्यावर पाठविण्यात आले आहे. कृपया पहावे.

(गुलाबराव ठाकरे)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
नागपूर.

प्रत — लेखा विभाग (देयक), हेच कार्यालय, यांना माहिती तथा आवश्यक कार्यवाहीस.